# नवीन भुसंपादन कायदा २०१३ च्या कलम १९(१) खाली
## अधिसुचना
## उपविभागीय अधिकारी, सेलू यांचे कार्यालय जिल्हा परभणी

दिनांकः- /०६/२०२०.

क्रमांक-भुसं/कावी-९१७/२०२०

(भुमिसंपादन, पुनर्वसन व पुर्नस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम -२०१३)

मौ. कुभांरी ता. जिंतुर येथील निम्न दुधना प्रकल्प डावा कालवा वितरीका/उपवितरीका साठी भुसंपादन

ज्याअर्थी, भुमीसंपादन पुर्नवसन व पुर्नस्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा आणी पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३(२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (ई) परंतुकाव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन काढण्यात आलेली अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकीर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२ दिनांक १९ जानेवारी २०१५ (यात पूढे जिचा निर्देश उक्त अधिसूचना असा करण्यात आला आहे.) या व्दारे असे अधिसूचीत केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अें) मध्ये व्याख्या केलेल्या एखादया सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्हयात ५०० हेक्टर पेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्हयाचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचीत शासन असल्याचे मानन्यात येईल.

आणी ज्याअर्थी भुमीसंपादन पुर्नवसन व पुर्नस्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा आणी पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३(२०१३ चा ३०) (यात पूढे ज्याचा निर्देश उक्त अधिनियम असा केलेला आहे.) त्याचा कलम ११ चा पोटकलम (१) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन राजपत्र क्रमांक १८ दिनांक २-८ मे २०१९ अन्वये प्रारंभिक अधिसुचना काढलेली आहे.

आणी ज्याअर्थि, उक्त अधिसुचनेनुसार समुचीत शासन असलेल्या, परभणी जिल्हयाच्या जिल्हाधिका-यास या सोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमीन (यात या पूढे जिचा निर्देश उक्त जमीन असा करण्यात आलेला आहे.) आवश्यक आहे.. अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते. ज्याच्या स्वरुपाचे विवरण या सोबत जोडलेलया अनुसूची दोन मध्ये दिलेले आहे. आणी म्हणून उक्त अधिनियमाचे कलम १९ च्या पोटकलम (१) च्या तरतुदीन्वये या व्दारे असे अधिसूचीत करण्यात येते की, उक्त जमीनीची उक्त सार्वजनीक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे असे या व्दारे घोषीत करण्यात येते.

आणी ज्याअर्थि, प्रस्तावीत भुमी संपादनाच्या अनुषंगाने बाधीत व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, या सोबत जोडलेल्या अंनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल तर या अनुसूची मध्ये कारणे नमुद करावीत).

आणी ज्याअर्थि सामाजिक परिणाम निर्धारण सारांश या सोबत जोडलेल्या अनुसूची चार मध्ये दिलेली आहे. आणी ज्या अर्थि कलम ४३ च्या पोट कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल, या सोबत जोडलेलया अनुसूची पाचमध्ये दिलेला आहे. (नियुक्ती करणे आवश्यक असेल तर, या अनुसूचीमध्ये तपशिल नमुद करावा)

त्याअर्थि आता, असे घोषीत करतो की, उक्त अधिनियमाच्या कलम-११ च्या पोटकलम ४ नुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधी पर्यत उक्त जमीनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही. किंवा उक्त जमीनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु उक्त जमीनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिका-यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमुद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातुन सूट देता येईल.

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपरस्पर उल्लंघन केल्यामुळे तीला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका-याकडून भरपाई दिल्या जाणार नाही.

तसेच उक्त अधिनियमाच्या कलम - ११ च्या पोटकलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी भुमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१४ (यात पुढे ज्यांचा निर्देश उक्त नियम असा करण्यात आला आहे.) यांचा नियम -१० च्या उपनियम (३) व्दारे विहीत केल्याप्रमाणे भुमिअभिलेखयाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषीत करण्यात येत आहे.

आणी ज्याअर्थी उक्त अधिनियमाच्या कलम-३ च्या खंड (छ) अन्वये, समुचीत शासन असलेल्या जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी भुसंपादन सेलू यांना पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची एक

### संपादीत करावयाच्या जमिनीचे वर्णन

गाव:- कुंभारी तालुका:- जिंतुर जिल्हा:- परभणी

| अ.क्र. | भुमापन किंवा गट क्रमाक | अंदाजीत क्षेत्र (हेक्टर आर मध्ये) |
|---|---|---|
| १. | ४५ | ०.४० |
| | एकून | ०.४० |

## अनुसूची - दोन

### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव:- निम्न दुधना प्रकल्प डावा कालवा वितरीका क्र.५१/उपवितरीका क्र.०३

प्रकल्प कार्याचे वर्णन:- निम्न दुधना प्रकल्प डावा कालवा साठी सार्वजनीक कामाचे प्रेयाजनार्थ

समाजाला मिळणारे लाभ:- सार्वजनीक हितार्थ

## अनुसूची - तीन

बाधीत व्यक्तीचे विस्थापन करण्यास: विस्थापनाची आवश्यकता नाही

भाग पाडणारी कारणे सबब माहिती निरंक

## अनुसूची - चार

(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणा-या अभिकरणाने दिलेल्या) सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश दिनांक १३ मार्च २०१५ चे राजपत्रात प्रसिध्द महाराष्ट्र शासनाची अधिसूचना क्रमांक संकीर्ण ०१/२०१५ /प्र.क्र.३/अ-२ नुसार उक्त अधिनियमाचे कलम-१० क नुसार सामाजिक प्रभाव निर्धारणाच्या तरतुदी लागु करण्यापासून सुट देण्यात आलेली आहे.

## अनुसूची - पाच

### नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील

अ) प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात:- आलेलया अधिका-याचे पदनाम — प्रशासक नियुक्तीची आवश्यकता नाही.

ब) प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता:- निरंक

क) ज्या अधिसुचनेव्दारे प्रशासकाची नियुक्ती:- करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशील — निरंक

टिप-उक्त जमीनीच्या आराखडयाचे उपविभागीय अधिकारी तथा भुसपादन अधिकारी, सेलू यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

दिनांक:- /०६/२०२०

ठिकाण:- सेलू

(उमाकांत पारधी)
उपजिल्हाधिकारी सेलू तथा
समुचित शासन